महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या विविध कार्यक्रमांचा प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी जाहीरात संस्थांचे पॅनेल तयार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मग्रारोहयो २०१२/प्रक्र.६५/रोहयो-६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ०६ सप्टेंबर, २०१२.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विभागाशी संबंधीत कार्यक्रमांचा प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी व जाहीरात विषयक कार्ये पार पाडण्यासाठी जाहीरात सल्लागारांची राज्यसूची तयार करण्याकिरता स्वारस्याच्या अभिव्यक्तींसाठी अर्ज मागविण्यात आले होते. याकरिता जाहीरात क्षेत्रातील विशिष्ट अनुकूल व व्यावसायीक अर्हताप्राप्त जाहीरात प्रचार व प्रसिध्दी संस्थांचे पॅनल तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासाठी वृत्तपत्रात जाहीरात देऊन विशिष्ट निकषाची पूर्तता करणा-या जाहीरात संस्थांच्या प्रस्तावाची छाननी करुन अर्हताप्राप्त केलेल्या जाहीरात संस्थांचे पॅनल तयार करण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या प्रयोजनासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट – १** मध्ये नमूद केलेल्या ५ जाहीरात संस्थांचा नियोजन (रोहयो) विभागाच्या अनूसूची (पॅनल) मध्ये समावेश करण्यासाठी शासन या शासन निर्णयाद्वारे मान्यता देत आहे.

या जाहीरात संस्थांचा पॅनलमधील समावेश खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे :-

१) दूरदर्शन, प्रसारभारती, आकाशवाणी व इंडियन न्युजपेपर सोसायटी या शासकीय संस्थांनी दिलेली अधिस्विकृती किंवा त्यांना अन्यथा असलेल्या जाहीरात विषयक कामाचा पूर्वानुभव व कामाची गुणवत्ता विचारात घेऊन वरील जाहीरात संस्थांचा या राज्यस्तरीय अनुसूचीमध्ये (पॅनेलमध्ये) अंतर्भाव करण्यात आला आहे. या जाहीरात संस्थांच्या सेवांचा उपयोग महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना विषयक व इतर अनुषंगिक कार्यक्रमांच्या प्रचार व प्रसिध्दीच्या कामांसाठी आवश्यकतेनुसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना संबंधी प्रचार — प्रसिध्दी क्षेत्रीय स्तरावर करणे आवश्यक असल्यास सदर पॅनलमधील जाहिरात संस्थांच्या सेवांचा उपयोग शासनाच्या पूर्व परवानगीने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२)(अ) या अनुसूचींमध्ये अंतर्भाव करण्यात आलेल्या जाहीरात संस्थांच्या सेवांचा उपयोग करण्यासाठी पारदर्शक व स्पर्धात्मक पध्दतीचा अवलंब करुन प्रत्येक कामाचे दर निश्चित करण्याचे अधिकार शासनाच्या रोहयो विभागाचे राहतील. त्यासाठी प्रथम त्या त्या विशिष्ट कामांच्या तांत्रिक व आर्थिक निविदा स्वतंत्र लिफाफ्यात प्रत्येक काम देताना पॅनलवरील किमान ४ पुरवठादाराकडून मागवाव्यात व त्यासाठी किमान ७ दिवसांची वेळ द्यावी. कामाची तातडी विचारात घेऊन हा कालावधी कमी करण्याचा अधिकार संबंधीत यंत्रणेच्या प्रमुखास राहील. मात्र यासाठी कारणे नमुद करावीत. प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा प्रथम उघडून, करुन घ्यावयाच्या प्रचार प्रसिध्दीच्या कामाचे स्वरुप, त्यासाठी आवश्यक गुणवत्ता यांचा विचार करुन अनुक्रमे पहिल्या तीन तांत्रिकदृष्टया सक्षम निविदाकारांचे आर्थिक निविदा लिफाफे उघडावेत. इतर आर्थिक निविदा न उघडताच संबंधीतांना परत कराव्यात. तांत्रिक निविदा उघडल्यावर परंतु आर्थिक निविदा उघडण्यापूर्वी आवश्यकतेनुसार तांत्रिक निविदा सादर केलेल्या निविदाधारकांकडून संबंधीत विषयावर दृकश्राव्य पध्दतीचे अथवा प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे कामाची गुणवत्ता मापन व परिणामकारकता यासाठी सादरीकरण घ्यावे व निविदांच्या तांत्रिक क्षमतेची त्या कामाच्या अनुषंगाने अंतिम निश्चिती करावी. अशाप्रकारे कामाच्या स्वरुपानुसार मुल्यांकन करुन सर्व निविदाकारांचा तांत्रिक गुणानुक्रम निश्चित करावा. अशा ३ प्रथम क्रमांकाच्या तांत्रिक निविदा असणा-या निविदाकारांच्या आर्थिक निविदा उघडून खालीलप्रमाणे पध्दतीचा अवलंब करुन प्रथम क्रमांकावर येणारी निविदा अंतिम करावी.

२)(ब) गुणानुक्रमे तांत्रिक क्षमतेत तीनपैकी कामाच्या स्वरुपानुसार प्रभावीपणे काम करु शकणा-या निविदाकारांपैकी ज्या निविदाकाराचे तांत्रिक सादरीकरण, प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता, कलाकारसंच, कथानक (स्टोरी), विषय (थीम), आर्टवर्क, पूर्वानुभव इत्यादी बाबी विचारात घेऊन सर्वोत्कृष्ट ठरली व प्रथम क्रमांकावर आली त्या निविदाकारास ६० गुण द्यावे. गुण कसे द्यावे, याचे सर्वसाधारण मार्गदर्शन **परिशिष्ट-२** मध्ये नमूद करण्यात आले आहे.

उर्वरित क्र. दोन व तीन वरील निविदाकारांना त्या प्रमाणात तांत्रिक निविदेसाठी ६० कमाल गुण विचारात घेऊन त्यांच्या तपासलेल्या तांत्रिक क्षमतेनुसार त्याप्रमाणात कमी गुण द्यावे व त्याचे विश्लेषण

दफ्तरी करुन ठेवावे. हे तांत्रिक विश्लेषण करतांना कामाची गरज पाहून गुण द्यावे. यासाठी त्या क्षेत्रातील तज्ञांची मदत घ्यावयासही प्रत्यवाय नाही.

२)(क) त्यानंतर या तीन संस्थांच्याही आर्थिक निविदा उघडाव्यात. त्यापैकी किमान दराच्या आर्थिक निविदेला ४० गुण द्यावेत. इतर दोघांना खालील सूत्रानुसार निश्चित करुन येणारे गुण द्यावे.

१) किमान निविदाकाराची रक्कम

---------------------------------- X ४० = दुस-या क्रमांकाच्या निविदाकारास मिळालेले गुण दुस-या क्रमांकाच्या निविदाकाराची रक्कम.

२) याप्रमाणे तिस-या निविदाकाराचेही गुण काढावेत.

२)(ड) त्यानंतर (ब) व (क) मध्ये प्रत्येकाला मिळालेल्या गुणांची बेरीज करुन अशा पध्दतीने ज्या निविदाकाराला सर्वात जास्त गुण मिळाले असतील. त्या निविदाकाराशी अंतिम वाटाघाटी करुन कामाचे वाटप करावे व त्याच्याशी आवश्यक करारनामा करावा/ त्यांना कार्यादेश द्यावेत.

अशाप्रकारे निश्चितीचे सविस्तर उदाहरण **परिशिष्ट -३** मध्ये दिले आहे.

३)अपवादात्मक तातडीच्या प्रकरणांमध्ये जाहीरातीसंबंधी कोणतेही काम देतांना कामाचे स्वरुप व शिल्लक असलेला अल्प वेळ विचारात घेऊन पॅनलवरील कोणत्याही संस्थेस ते काम नेमून देण्याचे अधिकार प्रधान सचिव (रोहयो) यांना आहेत. अशा प्रकरणांमध्ये परिच्छेद क्र.(२) मध्ये नमूद केलेल्या निविदा प्रक्रियेची आवश्यकता राहाणार नाही. यासाठी पूर्वानुभव विचारात घेऊन पॅनलवरील कोणत्याही संस्थेस काम प्रदान करण्याचे अधिकार त्यांना राहतील. त्याचप्रमाणे कामाचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेऊन एखादे काम पॅनलवरील इतर संस्थांना विभागून देण्याचे अधिकार सुध्दा प्रधान सचिव (रोहयो) यांना राहतील.

४) तसेच वृत्तपत्र, दूरदर्शनवर, अन्य खाजगी वाहिन्यांवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यमातून प्रसिध्दी करावयाच्या प्रचार प्रसिध्दी विषयक जाहीरातींचे दर केंद्र आणि राज्य शासनाने पूर्वीच निश्चित केले असल्यामुळे अशा जाहीराती प्रसारीत करण्याचे काम देण्यासाठी निविदा प्रक्रीयेची गरज नाही. अशी कामे, प्रथम परिशिष्ट -१ मध्ये नमूद केलेल्या यादीमधील कोणत्याही अधिस्विकृती प्राप्त जाहीरात संस्थेमार्फत करुन घेण्यात यावीत. अधिस्विकृती नसलेल्या इतर संस्थांनी अधिस्विकृती मिळवल्यास त्यानंतर त्यांनाही शासकीय दराने प्रचार प्रसिध्दीविषयक जाहीराती प्रसिध्दीची कामे देता येतील.

५) अनूसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या संस्थांचा जाहीरात क्षेत्रातील कामांचा अनुभव व व्याप्ती लक्षात घेता सर्वसाधारणपणे पुढीलप्रकारची कामे या संस्थांकडे सोपविता येतील :-

अ) प्रभावी प्रचार व प्रसिध्दीसाठी **संकल्पना निर्मिती** करणे (Conceptualization)

ब) दृक-श्राव्य, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातून योजनेची प्रसिध्दी करणे,

क) मराठी भाषेतील माहिती पुस्तिका, पत्रके, भित्तीपत्रिका, फलक, बॅजेस, भित्तीचित्रे यांचे आरेखन व छपाई

ड) ग्रामीण भागात विविध मेळावे भरविण्याची क्षमता

इ) संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शन / रोड शोजचे आयोजन

फ) संपूर्ण देशातील नरेगा योजने संदर्भातील वृत्तपत्र कात्रणे आणि माहिती पुरविणे.

६) जाहीरात संस्थेस जाहीरात विषयक काम देतांना आवश्यकता असल्यास कामाच्या अटी व शर्तीचा समावेश असलेला उभयपक्षी करारनामा करुन त्यानंतरच कार्यादेश निर्गमित करण्यात यावेत अथवा ऑफर लेटरमध्ये अटी व शर्ती नमूद करुन त्या मान्य असल्याचे लेखी पत्र संबंधीत जाहीरात संस्थेकडून घ्यावे.

७) कोणत्याही प्रकारचे वर नमूद केलेले प्रचार प्रसिध्दी विषयक काम करण्यापूर्वी त्या कामाच्या खर्चासाठी सर्वसाधारणपणे अग्रीम रक्कम अनुज्ञेय नाही. परंतु बँक गॅरंटीवर व इतर तत्सम सेक्युरिटीवर २० % पर्यंत अग्रीम रक्कम देता येईल. तथापी, नेमून दिलेले काम विहित वेळेत व करारनाम्यामधील अटी व शर्तीनुसार पूर्ण झाल्याची संबंधीत यंत्रणेच्या विभागप्रमुखांची खात्री झाल्यानंतरच जाहीरातीच्या देयकाचे प्रदान करण्यात येईल.

८) या जाहीरात संस्थांचा पॅनलवरील समावेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीकरिता राहील. या दोन वर्षाच्या कालावधीतील या संस्थांच्या एकूण कार्यक्षमतेचा व परिणामकारकतेचा आढावा घेऊन संबंधीत संस्थेच्या पॅनलमधील समावेशास पुढील मुदतवाढ देण्याचे अथवा पॅनलवरुन नाव कमी करण्याचे अधिकार शासनाला असतील.

९) उपरोक्त पॅनलवरील जाहीरात संस्थांच्या कामकाजाबाबत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करणा-या यंत्रणा व इतर शासकीय / निम शासकीय संस्था यांच्याकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रारीची योग्य तपासणी करुन सदर जाहीरात संस्थेचे नाव अनुसूचीमधून (पॅनलमधून) कमी करण्याचे

तसेच, या पॅनलमध्ये वेळोवेळी इतर जाहीरात संस्थांचा अंतर्भाव करण्याचे व वर नमूद केलेल्या अटी शिवाय जादा अटी समाविष्ट करण्याचे अधिकार शासनास असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

6/9/2012

(आर.विमला)
उप सचिव (रोहयो)

प्रति,
मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
प्राचार्य,सर.जे.जे.स्कूल ऑफ आर्ट,मुंबई,
सहसंचालक, आय.ई.सी.ब्युरो,पुणे,
उप सचिव (श्रीमती विमला / श्री.पाटील), रोहयो (नियोजन) विभाग,मंत्रालय,मुंबई,
मे.गोल्डमाइन ॲडव्हर्टायझींग,३०६,द सुमित, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, हनुमान रोड जवळ, विलेपार्ले (पूर्व), मुंबई -५७
मे.व्हेनचूरा ॲडव्हर्टाईजिंग,३०७,३०९,अपोलो कॉम्प्लेक्स, आर.के.सिंग मार्ग,अंधेरी (पूर्व) मुंबई-६९,
मे.दिशा कम्युनिकेशन प्रा.लि.२१४-२१४-अ, रिझवी चेंबर्स, हिल रोड, बांद्रा, मुंबई-५०,
मे. पॅरामाईन ॲडव्हर्टाईजिंग,४-अ,बोटावाला चेंबर्स, पहिला मजला, पी.एम.रोड,फोर्ट,मुंबई – ०१,
मे.ॲस्ट्रल ॲडव्हर्टाईजिंगयुनिट नं.१,दुसरा मजला, हिंद सर्व्हीस इंडस्ट्रिज, जांभेकर मार्ग,शिवाजी पार्क,दादर(प)-२८,
निवडनस्ती.

( शासन निर्णय क्र. मग्रारोहयो २०१२/प्रक्र ६५/रोहयो-६ब, दिनांक - ०६ सप्टेंबर, २०१२ चे सहपत्र)

## परिशिष्ट -१

## पॅनलवरील जाहिरात संस्थांची यादी

१)मे.गोल्डमाइन ॲडव्हर्टायझींग,
३०६,द सुमित, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
हनुमान रोड जवळ,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई -५७

२)मे.व्हेनचूरा ॲडव्हर्टाईजिंग,
३०७,३०९,अपोलो कॉम्प्लेक्स,
आर.के.सिंग मार्ग,
अंधेरी (पूर्व) मुंबई-६९,

३)मे.दिशा कम्युनिकेशन प्रा.लि.
२१४-२१४-अ, रिझवी चेंबर्स,
हिल रोड, बांद्रा, मुंबई-५०,

४)मे. पॅरामीन ॲडव्हर्टाईजिंग,
४-अ,बोटावाला चेंबर्स,
पहिला मजला, पी.एम.रोड,
फोर्ट,मुंबई – ०१,

५)मे.ॲस्ट्रल ॲडव्हर्टाईजिंग युनिट नं.१,
दुसरा मजला, हिंद सर्व्हीस इंडस्ट्रिज, जांभेकर मार्ग,शिवाजी पार्क,दादर(प), मुंबई -२८.

( शासन निर्णय क्र. मग्रारोहयो २०१२/प्रक्र ६५/रोहयो-६ब, दिनांक - ०६ सप्टेंबर, २०१२ चे सहपत्र)

## परिशिष्ट -२

## तांत्रिक मुल्यांकनासाठी मार्गदर्शक तत्वे

| अ.क्र. | मुद्दा | कमाल गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कामाचे स्वरुप पाहता प्रचार प्रसिध्दीच्या माध्यमातून जनमानसापर्यंत जे संदेश द्यावयाचे आहेत, माहिती पोहोचवायची आहे. क्षमता बांधणी (Capacity Building)अपेक्षित आहे, ते पूर्णपणे संकल्पनेत, आर्टवर्कमध्ये प्रभावीरित्या मांडले गेले काय, याची तपासणी करुन द्यावयाचे गुण | २० | |
| २ | संकल्पनेची, मांडणीची, आर्टवर्कमधील — अ) कल्पकता - १० गुण ब) नाविन्यपूर्णता - १० गुण | १० १० | |
| ३ | तांत्रिक मनुष्यबळ व उपलब्ध पायाभूत सुविधा | १० | |
| ४ | गेल्या एक वर्षातील विविध शासकीय / निम-शासकीय / खाजगी आस्थापनांकरिता केलेली समान स्वरुपाची कामे | १० | |
| | एकूण गुण | ६० | |

Advertisement Panel

( शासन निर्णय क्र. मग्रारोहयो २०१२/प्रक्र ६५/रोहयो-६ब, दिनांक - ०६ सप्टेंबर, २०१२ चे सहपत्र)

## परिशिष्ट -३

## तांत्रिक व आर्थिक निविदांना गुणवितरण करण्यासाठी उदाहरण

१)समजा अ,ब,क,ड,ई,फ या सहा निविदाकारांच्या तांत्रिक व आर्थिक निविदा प्राप्त झाल्या.

२) यापैकी समजा तांत्रिक मुल्यांकनात गुणानुक्रम खालीलप्रमाणे ठरले.

| | | |
|---|---|---|
| ब | - | १ |
| ड | - | २ |
| अ | - | ३ |
| इ | - | ४ |
| फ | - | ५ |
| क | - | ६ |

३) प्रथम क्र. १,२,३ गुणानुक्रमे निवडून त्यांचेकडून सविस्तर सादरीकरण घ्यावे व ३ गुणानुक्रमे निश्चित करुन क्र.१ ला ६० गुण धरुन इतरांना त्या प्रमाणात कमी गुण द्यावेत. समजा ते खालीलप्रमाणे मिळालेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (i) | ब | १ | - | ६० गुण |
| (ii) | ड | २ | - | ५० गुण |
| (iii) | अ | ३ | - | ४५ गुण |

४)त्यानंतर वरील तीन निविदाकारांचे आर्थिक प्रस्ताव उघडावे, समजा ते खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ब | - | रु. | ५ लाख |
| ड | - | रु. | ४ लाख |
| अ | - | रु. | ४.५ लाख |

या संस्थांपैकी सर्वात कमी आर्थिक निविदा असलेल्या **ड** निविदाकारास **४० गुण** द्यावेत. इतर दोघांना खालीलप्रमाणे गुण द्यावेत.

$$\text{ब - } \frac{\textbf{ड}\text{ ची निविदा रक्कम}}{\textbf{ब}\text{ ची निविदा रक्कम}} \times ४० = \frac{४}{५} \times ४० = \textbf{३२ गुण}$$

$$\text{अ - } \frac{\textbf{ड}\text{ ची निविदा रक्कम}}{\textbf{अ}\text{ ची निविदा रक्कम}} \times ४० = \frac{४}{४.५} \times ४० = \textbf{३५.६ गुण}$$